दिनांक १.५.८४ ते दिनांक ३०.४.८७ या कालावधीत अर्ज केलेल्या भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांना निवृत्ती वेतन व इतर आर्थिक सहाय्य देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-पीओजेस-१०९२/प्र.क्र.१०१/९२/स्वासैकक्ष,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ७ ऑगस्ट, १९९२.

पहा : १] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओजेस-१२८३/भूस्वासै/विक-१/स्वासै, दिनांक ३ डिसेंबर, १९८३.

२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओजेस-१२८६/भूस्वासै/स्वासैकक्ष, दिनांक ७ ऑगस्ट, १९८६.

शासन निर्णय :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:-पीओजेस-१०७०/एल-१, दिनांक १०.८.७० नुसार भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांची व्याख्या निश्चित करण्यात आली. भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांचे अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख ३०.४.८४ अशी होती. परतु त्यानंतरही दिनांक १.५.८४ ते ३०.४.८७ या कालावधीत ब-याच भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांचे अर्ज प्राप्त झाले. त्या स्वातंत्र्य सैनिकांना पेन्शन मंजूर करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. आता शासनाने असा निर्णय घेतला आहे की, दिनांक १.५.८४ ते दिनांक ३०.४.८७ या कालावधीत प्राप्त झालेल्या भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांच्या अर्जावर विचार करुन निकष पूर्ण करणा-या पात्र अर्जदारांना दिनाक ९.८.१९९२ पासून भूमिगत स्वातंत्र्य सैनिक सन्मान पेन्शन मंजूर करावी.

२. सदर बाबीवर होणारा खर्च लेखाशीर्ष "२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण-६०-इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम-१०२-सामाजिक सुरक्षा योजनेखाली निवृत्ती वेतन [१] स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती इत्यादींना निवृत्ती वेतन [मागणी क्रमाक ए-१४][संगणक संकेतांक २२३५००१५]" या खाली असलेल्या वित्तीय तरतुदीमधून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक :सीआर-७९८/व्यय-४, दिनाक ६.८.९२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ च.रा.चक्का ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
१] राज्यपाल यांचे सचिव,

कृ.मा.प.

२] मुख्यमंत्री यांचे सचिव,

३] सर्व मंत्री, राज्यमंत्री व उपमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,

४] अध्यक्ष, सभापती व इतर सदस्य, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,

५] सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,

६] महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र राज्य, मुंबई,

७] महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र राज्य-२, नागपूर,

८] सर्व विभागीय आयुक्त,

९] सर्व जिल्हाधिकारी,

१०] अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

११] सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

१२] निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,

१३] वित्त विभाग, इएक्सपी-४, वित्त विभाग, जीईएन-५ [५ अधिक प्रतींसह],

१४] सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन क्र. २५,

१५] माहिती व जनसंपर्क महासंचालनालय [प्रसिध्दीपत्रक काढण्यासाठी]

१६] निवड नस्ती.